**अतारांकित प्रश्नोत्तरांची बासष्ठावी यादी**

# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मुंबईतील खाजगी प्राथमिक शाळांमधील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी वेतनापासून वंचित असल्याबाबत**

**(१) ५८१ (०८-०४-२०२०). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिका हद्दीतील खाजगी संस्थाद्वारा चालविण्यात येणाऱ्या शाळांना शालेय शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी आयुक्त, महानगरपालिका यांना ५० टक्के शासकीय अनुदान न देण्याबाबतच्या सन २००४ च्या शासन निर्णयात कोणताही बदल झाला नसल्याचे लेखी पत्र पाठवल्यामुळे मुंबईतील सुमारे १०४ खाजगी प्राथमिक शाळा मधील ५०० हून अधिक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना वेतनापासून वंचित राहावे लागले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण हक्क अधिनियम २०११ मधील नियम ४ मधील तरतुदीच्या अनुषंगाने राज्य शासनाने निर्गमित केलेल्या दिनांक ७ जुलै, २०१५ रोजीच्या शासन निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करणे तसेच १०४ खाजगी प्राथमिक शाळांना ५० टक्के अनुदान उपलब्ध करून देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच किती कालावधीत सदरहू निर्णयाची अंमलबजावणी शासनाकडून करणे अपेक्षित आहे.

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. वर्षा गायकवाड (१६-९-२०२१) :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सन २००१ पर्यंतच्या खाजगी प्राथमिक शाळांना राज्य शासनाकडून ५०% व बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून ५०% अनुदान देण्यात येते.

तथापि, सन २००१-०२ या शैक्षणिक वर्षापासून बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्यांच्या क्षेत्रात मान्यता दिलेल्या खाजगी प्राथमिक शाळांचे अनुदान यापुढील कालावधीत राज्य शासनाच्या अनुदानासाठी ग्राह्य धरले जाणार नसल्याबाबत शालेय शिक्षण विभागाने दिनांक १३/०१/२००४ रोजी महानगरपालिकेस कळविले आहे.

शासन निर्णय दिनाक ७/७/२०१५ नुसार, महानगर पालिकेतील शाळांना ५० टक्के अनुदानासाठी ग्राहय धरण्याचा निर्णय घेतला आहे. तथापि, दिनांक १३ जानेवारी, २००४ नंतर मुंबई महानगर पालिका क्षेत्रातील विनाअनुदानित तत्वावर प्रथम मान्यता दिलेल्या खाजगी प्राथमिक शाळांना अनुदान मंजूर करता येत नसल्याचे शासनाच्या दिनांक २२/३/२०१७ व दि.१०/७/२०२० च्या पत्रान्वये स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ मधील तरतूदीनुसार प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी ही स्थानिक स्वराज्य संस्थांची देखील आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अकोला जिल्हयातील सर्वोपचार रुग्णालयात अपुरे मनुष्यबळ असल्याबाबत

**(२) १२७१ (१३-०४-२०२०). श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयातील सर्वोपचार रुग्णालयासाठी भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकानुसार २ हजार २३६ कर्मचा-यांची आवश्यकता आहे, मात्र मंजुर आकृतीबंधानुसार केवळ ७७३ कर्मचारी (३० टक्के मनुष्यबळ) कार्यरत असल्याचे दिनांक ९ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात अपुऱ्या मनुष्यबळामुळे चांगली रुग्णसेवा मिळत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (२२-०६-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला येथे २०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेकरिता आवश्यक पद निर्माण करण्याबाबत संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्या कडून प्रस्ताव प्राप्त झाल्यावर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. प्रसंगत: केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजना (PMSSY-III) अंतर्गत अकोला, औरंगाबाद, लातूर आणि यवतमाळ या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांत अतिविशेषोपचार रुग्णालयाकरीता शासन निर्णय दि. ०८.०१.२०२१ अन्वये प्रथम टप्प्याकरीता ८८८ पदे निर्माण करण्याकरीता शासनाची मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यामध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अकोला येथील विशेषोपचार रुग्णालयासाठीच्या २२३ पदांचा समावेश आहे. तसेच उर्वरीत पदे निर्माण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

### धाड (ता.जि.बुलढाणा) येथील बस स्थानकाची झालेली दूरवस्था

**(३) १५६९ (०८-०४-२०२०). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाड (ता. चिखली, जि. बुलढाणा) हे गाव अत्यंत महत्वाचे असून या गावाला विदर्भ तसेच मराठवाडयातील अनेक खेडी लागून आहेत तसेच या गावात परिसरातील मुख्य बाजारपेठ असून बुलढाणा-औरंगाबाद रस्त्यावरील प्रमुख मध्यवर्ती ठिकाण आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील बसस्थानाकाची दुरवस्था झालेली असल्याने बसस्थानक विकासासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे नागपूर येथे मा. मुख्यमंत्री यांनी घेतलेल्या आढावा बैठकी दरम्यान केली, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, शासनाने या प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१५-०९-२०२१) :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे मागणीचे लेखी पत्र प्राप्त झालेले नाही.

(३) सदर बसस्थानकावर ३ फलाट, वाहतूक नियंत्रण कक्ष, उपहारगृह, रसवंतीगृह, केशकर्तनालय, जेनेरिक, पार्सल व्यवस्था, प्रवाशांकरीता मुतारी, प्रतिक्षालय, आसन व्यवस्था, पिण्याचे पाणी इ. सुविधा उपलब्ध आहेत. नुकतेच बसस्थानकाच्या रंगरंगोटीचे काम पूर्ण झालेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गणेशपेठ आगार, नागपूर येथे डिझेलचा निर्माण झालेला तुटवडा**

**(४) १६४२ (२३-०४-२०२०). ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गणेशपेठ, नागपूर येथे डिझेलच्या तुटवडयामुळे आगारातील जवळपास १०० बसफेऱ्या दिनांक ९ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास रद्द करण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खासगी बसेसना याचा फायदा मिळावा याकरिता जाणीवपूर्वक विभागीय नियंत्रक कार्यालयाकडून डिझेल संपण्यापूर्वी टँकर आरक्षित करण्यात येत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास बसफेऱ्या रद्द केल्याने प्रवाशांना झालेल्या गैरसोयीस व महामंडळाच्या झालेल्या आर्थिक नुकसानीस जबाबदार अधिकारी/कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. अनिल परब (०८-०७-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

डिझेल अभावी दि.०९.०१.२०२० रोजी ११ फेऱ्या रद्द करण्यात आलेल्या आहेत. तसेच, दि.१०.०१.२०२० रोजी ३८ व दि.१२.०९.२०२० रोजी १२ अशा एकूण ६१ फेऱ्या रद्द करण्यात आलेल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) वरील मार्गावरील रद्द करण्यात आलेल्या फेऱ्या ह्या जास्त वारंवारिता असलेल्या मार्गावरील असल्यामुळे प्रवाशांच्या वाहतूकीची गैरसोय झालेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर येथील पुनर्मुल्यांकन शुल्क परत करण्याबाबत**

**(५) १७६५ (०६-०४-२०२०). ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर येथील पुनर्मुल्यांकनामध्ये गुण वाढल्याने नियमानुसार पुनर्मुल्यांकन शुल्क परत करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत पुनर्मुल्यांकन कक्षाचे शुल्क परत न करण्याबाबत कोणतेही आदेश/निर्देश प्राप्त नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने मागील ३ वर्षात एकूण किती विद्यार्थ्यांना पुनर्मुल्यांकन शुल्क परत केले,

(४) असल्यास, विद्यार्थ्यांना पुनर्मुल्यांकन शुल्क परत करण्याबाबत विद्यापीठाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (१६-०९-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे. याबाबत विद्यापीठामार्फत प्रक्रिया सुरु आहे.
(३) व (४) शुल्क परत करण्याबाबत विद्यार्थ्यांकडून / महाविद्यालयामार्फत कोणतेही आवेदन प्राप्त न झाल्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विदयापिठातील भरती प्रक्रियेत झालेला गैरप्रकार

**(६) २११७ (०३-०४-२०२०). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विदयापिठातील कामांची विभागणी करुन नियमबाहय पध्दतीने विदयापिठ प्रशासनाने मर्जीतील गुत्तेदारांना कामाचे वाटप केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वसंतराव नाईक मराठवाडा विद्यापिठातील प्रकल्पग्रस्ताच्या सन २००९ मधील जाहिरातीमधे वर्ग-४ व वर्ग- ३ च्या नोकर भरतीमध्ये निवड समितीच्या सहया स्कॅन करून १३० लोकांना नियम बाहय जास्तीचे गुण प्राप्त असणाऱ्या उमेदवारांना डावलून कमी गुण धारकांना नियुक्त्या देऊन विद्यापीठ प्रशासनाने गैरप्रकार केला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उच्च न्यायालयाच्या याचीका क्रमांक ३४८९ दिनांक १३ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या आदेशान्वये गुणवत्ता धारकांना नियुक्त्या देण्याचे आदेश असतांना ही नातेवाईक नोकरीस असल्याचे कारण दाखवून डावलले, परंतू ८० जणांचे नातेवाईक नोकरीस असतांनाही त्यांना नियुक्त केले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार चौकशीत दोषी आढळून आलेल्या संबंधितांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (११-०५-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
कुटुंबातील व्यक्तीस प्रकल्पग्रस्त कोट्यातून यापूर्वी नियुक्ती दिलेली असल्यामुळे त्यांना पुनर्वसन कायद्यामधील तरतूदीनुसार नियुक्ती देता येत नाही अशी शिफारस निवड समितीने केली आहे. त्यामुळे उक्त प्रकरणी मा.न्यायालयाच्या निकालाच्या अनुषंगाने याचिकाकर्त्यास विद्यापीठ सेवेत नामनिर्देशनाने नियुक्ती देता येत नाही, असे कळविण्यात आलेले आहे.
(४) सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, परभणी यांनी दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांना तपासणी करून फेर अहवाल सादर करण्याबाबतच्या सूचना दिलेल्या होत्या तरी, सदरचा अहवाल प्राप्त झाला असून त्यावर शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मलकापुर (जि.बुलढाणा) येथील राज्य परिवहन विभागाच्या बसेस कालबाह्य झाल्याबाबत**

**(७) २२६१ (०८-०४-२०२०). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर, (जिल्हा बुलढाणा) येथील राज्य परिवहन विभागाच्या आगारातील सुमारे २० बसेस कालबाह्य झाल्या असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कालबाह्यतेमुळे कमी झालेल्या बस गाड्या मलकापूर आगारातून प्रवाशांसाठी उपलब्ध करून न दिल्याने बसने प्रवास करणारे प्रवासी आपला जीव धोक्यात घालून खाजगी वाहनाने प्रवास करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार प्रवाशांची होणारी गैरसोय टाळण्याच्या अनुषंगाने मलकापूर जिल्हा बुलढाणा या आगारात नवीन बसेस उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१५-०९-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) मलकापूर आगारातील जुन्या/कालबाह्य झालेल्या ४ बसेस मोडीत काढण्यात आलेल्या असून, नवीन ३ व एम.एस.धातुमध्ये पुनर्बांधणी केलेल्या ७ अशा एकूण १० बसेसचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बल्लारपूर (जि.चंद्रपूर) येथे कृषी उत्पन्न बाजार समितीद्वारा बारीक धानाची खरेदी करण्याबाबत**

**(८) २७९८ (०३-०४-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बल्लारपूर (जि.चंद्रपूर) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीद्वारा बारीक धानाची खरेदी करण्याबाबत प्रशासक कृषी उत्पन्न बाजार समिती, पोंभुर्णा (जि.चंद्रपूर) यांना विधानसभा सदस्य, बल्लारपूर यांनी दिनांक ३ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२२-०९-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) धानाला हंगाम २०१९-२० साठी रु.१८१५ प्रति क्विंटल किमान आधारभूत किंमत देण्यात आली होती. तसेच रु.५०० इतका बोनस दिल्यामुळे धानाची रु.२३१५ प्रतिक्विंटल या दराने महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळा मार्फत पोंभूर्णा येथे दि.१५/११/२०१९ पासून साधारण व बारीक धानाची खरेदी केली जात होती. महामंडळामार्फत पोभूर्णा खरेदी केंद्रावर २०२४.२२ क्विंटल धानाची रू.२,३१५ प्रतिक्विंटल दराने खरेदी करण्यात आली आहे. खुल्या बाजारात महामंडळाने खरेदी केलेल्या दराइतका भाव मिळत नसल्यामुळे कृषी उत्पन्न बाजार समिती यार्डात धानाची आवक झाली नाही. त्यामुळे बाजार समितीच्या यार्डात धानाची खरेदी-विक्री झाली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसमध्ये आवश्यक त्या सुधारणा करून कर्मचाऱ्यांच्या मागण्याची पुर्तता करण्याबाबत**

**(९) २८०४ (०९-०४-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसमध्ये आवश्यक त्या सुधारणा करून प्रवाशांना योग्य सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत तसेच एस.टी. कर्मचाऱ्यांच्या मागण्यांची पुर्तता करण्याबाबत विधानसभा सदस्य, बल्लारपूर यांनी दिनांक ३० डिसेंबर,२०१९ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. अनिल परब (१६-०९-२०२१) :** (१) होय.

(२) राज्य परिवहन वाहनांची वेगमर्यादा शासन धोरणानुसार ८० कि.मी.प्रति तास इतकी आहे. सर्व वाहनांना इलेक्ट्रीक हॉर्न बसविण्यात आले असून, त्यांचे रिडींग सुरु आहे. महामंडळात १६१५२ मंजूर नियतांकरीता १८,४७२ वाहने उपलब्ध आहेत. सरळसेवा भरती २०१६-१७ अंतर्गत राज्य परिवहन महामंडळामध्ये सहाय्यक (मॅकनिकल) पदाच्या ३२९३ रिक्त जागांपैकी २७०४ उमेदवारांना नेमणूका देण्यात आल्या आहेत. २१ जिल्हयाकरीता चालक तथा वाहक पदाच्या ८०२२ रिक्त जागांसाठी सरळसेवा भरतीद्वारे अंतिम निवड यादीवरील ४२२८ उमेदवारांपैकी २७५३ उमेदवारांना सेवापूर्व प्रशिक्षण सुरु आहे.

सन २०१५-१६ ते २०१९-२० या कालावधीत ४३९५ नवीन बसेसचा वाहन ताफ्यात समावेश केला असून ४३९९ बसेस मोडीत काढण्यात आलेल्या आहेत.

गडचिरोली विभागातील ३ आगारांसाठी २३९ नियतांसाठी २५४ बसेस सुस्थितीत उपलब्ध आहेत.

महामंडळाच्या सर्व विभागांकडून गाडयांच्या सुटया भागांच्या खरेदी करीता खरेदी आदेश प्रसारीत करुन सुटे भाग उपलब्ध करुन देण्यात येते व त्याचा पुरेसा साठा ठेवण्यात येतो. ग्रामीण व दुर्गम भागातील प्रवाशांच्या सोयीकरीता महामंडळाच्या वाहन ताफ्यात टाटा व महिंद्रा बनावटीच्या १९२ बसेस उपलब्ध आहेत.

राज्य परिवहन सेवानिवृत्त आणि स्वेच्छासेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी व त्यांच्या पती / पत्नीस दि.०१.०६.२०१८ पासून सहा महिन्याचा मुदतीचा मोफत प्रवास पास देण्यात आला आहे. कामगार करारातील तरतूदीनुसार तसेच शासनाने दिलेल्या निकषाप्रमाणे आदिवासी, अतिसंवेदनशील, नक्षलग्रस्त भागात कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता दिला जातो. सुधारित वेतनश्रेणीनुसार कर्मचा-यांच्या मूळ वेतनात वाढ देण्यात आली आहे.

राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील विविध आगार/ बस स्थानकांमध्ये चालक / वाहक विश्रांतीगृहाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. ग्रामीण भागात मुक्कामी राहणाऱ्या बसेसमध्ये चालक/वाहकांना झोपण्याकरीता सुविधा उपलब्ध केलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुक्ताईनगर (जि.जळगांव) शहरातील बस आगारातील व्यापारी संकुलाबाबत**

**(१०) ३१६४ (०८-०४-२०२०). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर शहर (जि. जळगांव) हे जवळपास ९० टक्के पुनर्वसित असल्याने तेथे कोणतेच व्यापार संकुल नसल्याने शहरातील मुख्य चौकामध्ये परिवहन महामंडळाच्या बस आगारातील एक एकर क्षेत्रामध्ये परिवहन महामंडळाच्या वतीने “बांधा, वापरा, हस्तांतरीत करा” या तत्वावर व्यापारी संकुल बांधण्याची मागणी तेथील व्यापाऱ्यांनी वारंवार शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीसंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१३-०९-२०२१) :** (१) व (२) सदर ठिकाणी व्यापारी संकुल बांधण्याबाबत व्यापाऱ्यांकडून कोणतीही मागणी प्राप्त झालेली नाही. तथापि, तत्कालिन मा.लोकप्रतिनिधी यांनी दि.२८.०९.२०१८ रोजीच्या बैठकीमध्ये नविन बसस्थानकाचे आधुनिकीकरणासह वाणिज्य आस्थापना तयार करणेबाबतच्या सूचना दिलेल्या होत्या. सदर जागेतील वाणिज्य उपलभ्यतेबाबतच्या पडताळणीसाठी वास्तुविशारदाची नियुक्ती महामंडळाद्वारे करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाने एस.टी. मधील वाय फाय सेवा बंद केल्याबाबत**

**(११) ३२८० (०९-०४-२०२०). श्रीमती मुक्ता टिळक (कसबापेठ) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाने एस. टी. मधील वाय फाय सेवा अचानक बंद केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एस. टी. मधील वाय फाय सेवा अचानक बंद करण्यामागील निश्चित कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे वा चौकशीत काय आढळून आले तदनुसार एस. टी. मधील वाय फाय सेवा पुन्हा नव्याने सुरु करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१३-०९-२०२१) :** (१) हे खरे आहे.

सदरची वायफाय सेवा दोन वर्ष देण्यात आली होती व त्यानंतर बंद करण्यात आली आहे.

(२) व (३) राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसमधून प्रवाशांना त्यांच्या वायफाय युक्त स्मार्टफोनमधून हॉटस्पॉटच्या माध्यमातून मोफत मनोरंजनात्मक सुविधा प्राप्त करुन देण्यासाठी राज्य परिवहन बसेसमध्ये वायफाय उपकरणे बसवून महामंडळाचा कोणताही खर्च न करता बसविण्यात आली होती व त्याद्वारे महामंडळास प्रतिवर्ष रु.१.०५ कोटी महसूल प्राप्त होत होता. दरम्यानच्या कालावधीमध्ये रिलायन्स जिओ व इतर कंपन्यांनी अत्यल्प दरात इंटरनेट सुविधा उपलब्ध करुन दिल्याने राज्य परिवहन महामंडळाच्या वायफाय योजनेस प्रवाशांचा प्रतिसाद अत्यंत कमी प्रमाणात मिळत होता. प्रवाशांना ही सेवा मोफत सेवापूरवठादाद्वारे करत असली तरी सेवा पुरवठादार कंपनीस सदर सेवा सुरु ठेवणे आर्थिक दृष्टया अवघड झाल्याचे तसेच यापुढे राज्य

परिवहन महामंडळास वार्षिक परवाना शुल्क देणे शक्य नसल्याचे सेवा पुरवठादार यांनी कळविले होते. सदर परिस्थिती विचारात घेता राज्य परिवहन व्यवस्थापनकडून एस.टी. मधील वायफाय सेवा बंद करण्यात आली.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पेंडाखळे (जि.कोल्हापूर) वनक्षेत्रात विना परवाना ऑप्टीकल फायबर केबल टाकल्या प्रकरणाची चौकशी करण्याबाबत**

**(१२) ३४७७ (०९-०४-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पेंडाखळे वनक्षेत्रात (जि.कोल्हापूर) विना परवाना केबल प्रकरणाची चौकशी करण्याबाबत विधानसभा सदस्य, बल्लारपूर यांनी मा.वनेमंत्री यांना दिनांक २२ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणाची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचा निष्कर्ष काय आहे, त्याअनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (२९-०९-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) मौजे-पेंडाखळे आणि मौजे-येरवाडी या गावातील वनक्षेत्रात रस्त्यालगत वन विभागाच्या परवानगी शिवाय मौजे-पेंडाखळे येथे कक्ष क्र.८५८ मधील ७२५ मीटर एवढ्या अंतरात आणि मौजे-येरवडी येथे कक्ष क्र.९४७ मधील २३५५ मीटर अंतरात रिलायन्स जिओ इन्फोकॉम लि. या कंपनीने ऑप्टीकल फायबर केबल टाकल्याचे आढळून आले आहे. सदर केबल जानेवारी, २०१८ ते फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत टाकण्यात आली असल्याचे प्राथमिक तपासणीत निदर्शनास आले आहे.

सदर प्रकरणी भारतीय वन अधिनियम, १९२७ तसेच, वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत दिनांक ०७/०१/२०२० रोजी गुन्हे नोंदविण्यात आले असून गुन्ह्यात वापरण्यात आलेली केबल जप्त करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी दुर्लक्ष झाल्याने संबंधित जबाबदार वनक्षेत्रपाल, वनरक्षक व वनपाल यांचेविरुद्ध उपवनसंरक्षक, कोल्हापूर यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम-८ अंतर्गत शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरु केली आहे. तसेच, तत्कालीन वनक्षेत्रपाल, पेंडाखळे यांचेविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम-१० अंतर्गत शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरु आलेली आहे. सदर प्रकरणी गुन्ह्यात वापरण्यात आलेली केबल खंडीत करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली रु.९०,०००/- इतकी रक्कम केबल खंडीत न करता खर्ची दाखविल्याचे निदर्शनास आल्यानंतर सदर रक्कम तत्कालीन वनपाल, पेंडाखळे (अतिरिक्त कार्यभार) यांचेकडून वसूल करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आपटा (ता.पनवेल, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील कोरळवाडी आदीवासीवाडी मुलभुत सोईसुविधांपासून वंचित असल्याबाबत**

**(१३) ३५०० (०२-०६-२०२०).श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आपटा (ता.पनवेल, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील कोरळवाडी आदिवासीवाडी आजही मुलभुत सोईसुविधांपासून वंचित असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्वच्छ पिण्याचे पाणी, शिक्षणाची सोय नसून रस्त्यांच्या झालेल्या दूरवस्थेमुळे आजारपणात दवाखान्यात नेताना आदिवासी महिलांना आपला जीवही गमवावा लागला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुलभुत सोयीसुविधांच्या मागण्यांसाठी कोरळवाडीतील नागरिकांनी पनवेल तहसिल कार्यालयावर मोर्चाही काढला होता, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोरळवाडी आदिवासीवाडीला तातडीने मुलभुत सोईसुविधा मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (१५-०९-२०२१) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

कोरळवाडी आदिवासी वाडी ही ओटीएसपी क्षेत्रात असून सदर वाडीची अनुसूचित जमातीची लोकसंख्या १०५ इतकी आहे. संबंधित आदिवासी वाडीमध्ये अंतर्गत रस्ता कॉँक्रीटीकरण व विद्युतीकरण झालेले आहे. तसेच जिल्हा परिषदेमार्फत समाजमंदीराचे बांधकाम करण्यात आलेले आहे. सन २०१५-१६ मध्ये ठक्कर बाप्पा वस्ती सुधार योजनेअंतर्गत विहीर बाधकाम करण्यात आलेले आहे. सन २०१७-१८ मध्ये आदिम जमाती संरक्षण तथा विकास कार्यक्रमाअंतर्गत बचतगटाच्या १० लाभार्थ्यांना विटभट्टी व्यवसायासाठी रु. २,४०,०००/- इतका निधी अदा करण्यात आलेला आहे. तसेच आदिम जमाती घरकुल योजनेअंतर्गत ९ लाभधारकांना प्रति घरकुल रु. १,००,०००/- इतका निधी देण्यात आलेला आहे. तर जिल्हा परिषदेमार्फत ७ घरकुले देण्यात आलेली आहेत.

आदिवासी पाड्यामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी एक बोअरवेल व विहिर असून एप्रिल व मे महिन्यात पाणी टंचाई उद्‌भवल्यास टॅंकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो.
कोरळवाडी येथे जिल्हा परिषद शाळेची इमारत आहे. मात्र शाळेचा पट निरंक असल्यामुळे शाळा समायोजित करण्यात आलेली आहे. कोरळवाडीकडे जाण्यासाठी असणाऱ्या ३ कि. मी रस्त्यापैकी २.५ कि. मी. रस्ता वनखात्याच्या अखत्यारीतील आहे.
(३) हे खरे आहे.
(४) व (५) कोरळवाडी आदिवासी वाड्याला उपलब्ध नसलेल्या सोई सुविधा पुरविण्याच्या अनुषंगाने दिनांक १८.०८.२०२० रोजी प्रकल्प अधिकारी, पेण यांनी अन्य अधिकाऱ्यांसमवेत संयुक्त पाहणी केली आहे. तसेच कोरळवाडीकडे जाण्यासाठी असणाऱ्या ३ कि. मी लांबीच्या कच्चा रस्त्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे सादर करण्यात येत आहे.

---

## मुंबई व नवी मुंबईत माथाडी कामगारांसाठी बांधण्यात आलेली गृहसंकुले बळकावण्यात आल्याबाबत

**(१४) ३६३२ (०३-०४-२०२०). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व नवी मुंबईत माथाडी कामगारांसाठी गृहसंकुले बांधण्यात आली असून सदरहू संकुले बळकावण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने गरीब माथाडींची हक्काची घरे माथाडी कामगारांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०६-०७-२०२१) :** (१) मुंबईतील माथाडी कामगारासाठी बांधण्यात आलेल्या गृहसंकुलातील मोजे आणिक वडाळा, मौजे चेंबूर येथील गृहसंकुले बळकाविण्यात आलेल्या तक्रारी मंडळास प्राप्त झालेल्या नाहीत. तथापि, सहयाद्री नगर चारकोप, मुंबई येथे माथाडी कामगारांना वितरित केलेल्या २९३ सदनिकांच्या हस्तांतरणबाबत कक्ष ११, गुन्हे शाखा, गु.प्र.शा. गुन्हा अन्वेषण विभाग, कांदिवली (पश्चिम), मुंबई यांचेमार्फत चौकशी सुरु आहे.

नवी मुंबई कोपरखैरणे विभाग सेक्टर-२ येथील सदनिका क्रमांक ८२४/८३६/ ९०९/८८८ या सदनिके मध्ये अनधिकृतपणे वास्तव्य करीत असल्याबाबतची तक्रार सन २०१९ मध्ये प्राप्त झाली आहे. नवी मुंबईमधील सिडकोच्या इतर कोणत्याही विभागात अशा तक्रारी प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही, असे व्यवस्थापक (शहर सेवा-१) शहर व औद्योगिक विकास महामंडळ (मर्यादित), बेलापूर नवी मुंबई यांनी कळविले आहे.

(२) व (३) सिडको, नवी मुंबई कोपरखैरणे विभागातील कार्यालयामार्फत संबंधित सदनिकाधारकांना दिनांक १९/०९/२०२० रोजी चौकशी नोटीस बजावण्यात आली आहे.

नवी मुंबईच्या कोपरखैरणे विभागात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने मा. दिवाणी न्यायधिश (कनिष्ठ स्तर ) वाशी येथे रे. मु. क्र. ४६/२०२०, रे. मु. क्र. ४७/२०२०, रे. मु. क्र. ४८/२०२०, व रे. मु. क्र. ४५/२०२० अन्वये दावा दाखल आहे. सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उस्मानाबाद जिल्हयात पॉली हाऊस, शेडनेटची उभारणी व त्यातील फुलांची पुर्नलागवड करण्याबाबत

**(१५) ३६६९ (०९-०४-२०२०). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी विभागाच्या नियमानुसार कृषी विभागाकडून योजना घेताना लाभधारकांस घेतलेल्या योजनेस ५ वर्षापर्यंत पुन्हा भाग घेता येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उस्मानाबाद जिल्हयामध्ये बऱ्याच पॉली हाऊस, शेडनेटची उभारणी व त्यातील फुलांची लागवड उभारणी ही मागील ८ ते ९ वर्षापुर्वी झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू लाभ धारकांनी पुर्नलागवड करण्याबाबतची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उस्मानाबाद जिल्हयात पॉली हाऊस, शेडनेटची उभारणी व त्यातील फुलांची पुर्नलागवड करण्यासाठी मदत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (१८-०३-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत हरितगृह/शेडनेट हाऊस या बाबीकरिता एका लाभार्थ्यास जास्तीत जास्त एकूण ०.४० हे. क्षेत्र मर्यादेपर्यंत लाभ देय आहे. सदरचा लाभ संबंधित लाभधारक शेतकरी हा एकाच वेळी किंवा त्याच्या आवश्यकतेनुसार घेऊ शकतो. या करिता ५ वर्षापर्यंतची अट लागू नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाचे पश्चिम खंडपीठ पुणे बेंच गत दोन वर्षापासून बंद असल्याबाबत

**(१६) ३९४७ (०७-०४-२०२०).श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाचे पश्चिम खंडपीठ पुणे बेंच हे दिनांक ३१ जानेवारी, २०१८ पासून शासनाच्या अनास्थेमुळे आणि न्यायाधीश व तज्ञ सदस्यांच्या नियुक्ती अभावी बंद असल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या खंडपीठापुढे ६५० याचिका सुनावणीसाठी प्रलंबित असल्याने ते माहे फेब्रुवारी, २०२० पासून सुरु करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार हे खंडपीठ सुरू करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (०६-०७-२०२१) :** (१) मा.राष्ट्रीय हरित लवाद, पश्चिम खंडपीठ, पुणे हे बंद नसून न्यायालयीन कामकाज व्हीडीओ कॉन्फरसिंगच्या माध्यमातुन मा.राष्ट्रीय हरित लवाद, प्रधान खंडपीठ, नवी दिल्ली कडून सुरू होते.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जालना बसस्थानकाचे नुतनीकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(१७) ३९७५ (०९-०४-२०२०). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना बसस्थानकाचे (जि.जालना) डिजिटल बस स्टँड करण्यासाठी दोन वर्षापूर्वी मान्यता मिळाली असताना सदरचे काम संथगतीने सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम संथगतीने सुरु असल्याने जागोजागी रस्ते खोदून ठेवलेले असून उघड्यावरील शौचालयाने दुर्गंधी, अस्वच्छता पसरली असून पथदिवे बंद असल्याने पाकिटमारी व मंगळसूत्र चोरी होणे असे प्रकार होत असल्याने प्रवासी त्रस्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर डिजिटल बसस्टँडसाठी प्रत्यक्षात सन २०१७ मध्ये मान्यता मिळाली, बसस्थानकाच्या नूतनीकरणासाठी ३ कोटी १२ लाख ६१ हजार ८२० रुपयांचा निधी मंजूर झाला, परंतु प्रत्यक्षात निविदा २ कोटी ३६ लाखांच्या काढण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. अनिल परब (१३-०९-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) बसस्थानक वाढ विस्तारीकरणाच्या कामाला सक्षम प्राधिकारी यांनी डिसेंबर, २०१७ मध्ये प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. तद्नंतर निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कामाचा कार्यादेश दि.२७.०९.२०१८ रोजी देण्यात आला. परंतू, बसस्थानक विस्तारीकरणाच्या ठिकाणी उपहारगृह व प्रसाधनगृह असल्याने सदर आस्थापनांचे पाडकाम करुन बसस्थानक विस्तारीकरणाचे कामास १ एप्रिल, २०१९ मध्ये सुरुवात झाली.

बसस्थानक व आवारातील सर्व पथदिवे चालुस्थितीत आहेत. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी बसस्थानकावर तीनही पाळीमध्ये सुरक्षा रक्षकांचीही नेमणूक करण्यात आलेली आहे. प्रवाशांच्या सुरक्षेकरिता बसस्थानकावर पोलीस चौकी असून, बसस्थानकावर सी.सी.टी.व्ही. यंत्रणा बसविण्यात आलेली आहे.

बसस्थानकाच्या नुतनीकरणासाठी मंजूर असलेल्या रु.३,१२,६१,८२०.०० रक्कमेपैकी रु.२,३६,४४,८४७.०० रक्कमेच्या निविदा काढण्यात आल्या व उर्वरीत रकमेमध्ये वाहनतळाचे डांबरीकरण, बसस्थानकास विद्युतीकरण करणे, लँडस्केपींग, वास्तुविशारदांचे शुल्क, विकास शुल्क इ. उपकामांचा समावेश आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पिंपरी चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिका क्षेत्रातील परिमंडल कार्यालयात बोगस शिधापत्रिका वितरीत होत असल्याबाबत

**(१८) ४७०१ (१४-०४-२०२०). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिका क्षेत्रातील परिमंडल कार्यालयात बोगस शिधापत्रिका दलालांमार्फत वितरीत करण्यात येत असून निगडी, पोलीस स्टेशन येथे बोगस शिधापत्रकाद्वारे फसवणूक झाल्याची तक्रार दिनांक ७ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास नागरिकांकडून करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्री.नितीन महादेव पडाळघरे यांची श्री.धनंजय चव्हाण (खाजगी व्यक्ती) यांनी बोगस शिधापत्रिका काढून फसवणूक केली असून अशाच प्रकारे नवीन शिधापत्रिका काढणे, नाव कमी करणे, नाव वाढवणे या कामाकरिता कार्यालय परिसरात कार्यरत असलेले दलाल नागरिकांकडून जादा पैशाची मागणी करुन फसवणूक करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील परिमंडळ कार्यालयात संबंधित दलाल तसेच बोगस शिक्के तयार करून शिधापत्रिका वितरीत करणाऱ्यांवर भरारी पथकामार्फत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. छगन भुजबळ (१६-०९-२०२१) :** (१) श्री. नितीन महादेव पडाळघरे यांची शिधापत्रिकेबाबत फसवणूक झाल्याने त्यांनी निगडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्र. ०००६/२०२० दि. ०७/०१/२०२० रोजी गुन्हा दाखल केला आहे.

(२) नवीन शिधापित्रका काढणे, नाव कमी करणे, नाव वाढवणे या कामाकरिता गैर शासकीय मध्यस्थ नागरिकांकडून जादा पैशाची मागणी करीत असल्याबाबत अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे कार्यालय व परिमंडळ अ कार्यालयास लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही.
(३) कार्यालयाबाहेरील गैर शासकीय मध्यस्थांवर वर आळा घालणेकामी अन्नधान्य वितरण कार्यालय, पुणे यांनी दिनांक २६.०४.२०१७ , दिनांक २५.९.२०१७, व दिनांक ७.०६.२०१९ या पत्रांव्दारे निगडी पोलीस स्टेशन यांना कळविले आहे. तसेच श्री. नितीन महादेव पडाळघरे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार वरीष्ठ पोलीस निरीक्षक, निगडी पोलीस स्टेशन याबाबत तपास करीत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जातीचे दावे अवैध ठरलेल्या शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना सेवेतून मुक्त करण्याबाबत**

**(१९) ४८६० (१८-०३-२०२०). श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जातीचे दावे अवैध ठरलेल्या शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना सेवेतून मुक्त करण्याचे आदेश मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाने दिले असतानाही त्याची अंमलबजावणी न करता १२५०० कर्मचारी सेवेतच असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कर्मचाऱ्यांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार सदरहू शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना सेवामुक्त करण्याबाबत तसेच पाठीशी घालणाऱ्यांविरुद्‌ध कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्‌धव ठाकरे (३०-०७-२०२१) :** (१) व (२) मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र.८९२८/२०१५ (चेअरमन ॲन्ड मॅनेजिंग डायरेक्टर, एफसीआय आणि इतर विरुध्द जगदिश बालाराम बहिरा व इतर) व इतर याचिका यामध्ये दि. ६.७.२०१७ रोजी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती अथवा इतर मागासवर्ग या जातींना असलेल्या आरक्षणाच्या आधारे शासकीय सेवेत नियुक्त झालेल्या व त्यानंतर जातीचे दावे अवैध ठरलेल्या व्यक्तींना शासकीय सेवेत संरक्षण देय ठरत नाही. अशा व्यक्तींना शासकीय सेवेत दिलेले संरक्षण घटनेतील तरतूदींशी विसंगत ठरते, असा निर्णय दिला आहे. शासनाचे विभाग व अखत्यारीतील कार्यालयांकडून प्राप्त माहितीनुसार अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेले सुमारे ५२९८ कर्मचारी सेवेत कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे. जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचाऱ्यांना पुढील आदेश होईपर्यंत शासन सेवेतून न काढण्याबाबत शासन परिपत्रक दि. २१.१०.२०१५ व शा.नि. दि. ५.६.२०१८ अन्वये सूचना देण्यात आल्या होत्या. त्यामुळे हे कर्मचारी सेवेत होते. त्यानंतर मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दि.६.७.२०१७ च्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी दि.२१.१२.२०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना नियमित पदावरुन दूर करुन त्यांना

अधिसंख्य पदावर दर्शविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कळवण (जि.नाशिक) शहरातील बसस्थानकात खड्डे पडल्याबाबत**

**(२०) ५१८० (१०-०४-२०२०). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळवण (जि.नाशिक) शहरात असलेल्या बसस्थानकात तसेच बस डेपोतही अनेक ठिकाणी खड्डे पडले असल्याचे माहे जोनवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत दोन वर्षापासून उक्त बसस्थानकात जागोजागी पडलेले खड्डे बुजविण्याकरिता डांबरीकरणाची मागणी करुनही दुर्लक्ष होत असल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे व उक्त बस स्थानकांच्या डांबरीकरणाकरिता किती निधीची तरतूद करण्यात आली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१३-०९-२०२१) :** (१), (२) व (३) कळवण आगाराच्या संपूर्ण वाहनतळाचे मे, २०१९ मध्ये डांबरीकरण केलेले वाहनतळ सुस्थितीत आहे. बसस्थानक वाहनतळावर किरकोळ स्वरुपाचे पडलेले खड्डे स्थानिक पातळीवर खडी/मुरुमाने बुजविण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कुलाबा संक्रमण शिबीरातील रहिवाश्यांना म्हाडाने बांधलेल्या इमारतीमध्ये कायमस्वरुपी घरे देण्याबाबत**

**(२१) ५२४४ (२०-०३-२०२०). ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुलाबा संक्रमण शिबीरातील रहिवाश्यांना आंबेडकर नगर, कुलाबा येथील म्हाडाने बांधण्यात आलेल्या इमारतीमध्ये कायमस्वरुपी घरे देण्याचा निर्णय घेतलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, म्हाडाने बांधलेल्या इमारती ७ मजल्याच्या असून त्यापैकी केवळ ३ मजल्यापर्यंतच ओ.सी. दिलेली आहे व ४ ते ७ मजल्यापर्यंत ओ.सी. न दिल्यामुळे ४ ते ७ मजले रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर संपुर्ण इमारतीला ओ.सी. देवून कुलाबा संक्रमण शिबीरातील रहिवाश्यांना या इमारतीमध्ये कायमस्वरुपी घरे देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (०७-०९-२०२१) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.
कुलाबा संक्रमण शिबीरातील ज्या रहिवाशांचा / भाडेकरुंचा बृहतसुचीमध्ये समावेश असेल, अशाच भाडेकरुंना प्राधिकरणाचा ठराव क्र.६३४२ नुसार गाळयांचे मालकी तत्वावर वाटप करण्यास मान्यता देण्यात येते.
(२) होय, हे अंशतः खरे आहे.
म्हाडाद्वारे प्रथम चरणात ०६ इमारती पैकी दोन इमारती क्र.१अ व २अ बांधली असून त्यामध्ये अनुक्रमे ७ मजले व ६ मजले बांधण्यात आले आहेत. यापैकी दोन्ही इमारतीतील तळ+तीन मजल्यापर्यंत संरक्षण खात्याचे "ना-हरकत प्रमाणपत्र" प्राप्त असल्याने तळ मजला+३ मजल्यापर्यंतच भोगवटा प्रमाणपत्र मिळालेले आहे.
(३) व (४) सदर संपूर्ण इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र मिळणेकामी संरक्षण खात्याकडे म्हाडाद्वारे पाठपुरावा करण्यात येत आहे. संरक्षण खात्याचे "ना-हरकत प्रमाणपत्र" न मिळाल्यामुळे भोगवटा प्रमाणपत्रास विलंब होत आहे.

---

### ठाणे जिल्हयातील बारवी धरणग्रस्तांना केडीएमसीच्या सेवेत सामावून घेण्याबाबत

**(२२) ५६९१ (१०-०४-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हयातील बारवी धरणाची उंची वाढविल्यामुळे विस्थापित झालेल्या प्रत्येक कुटुंबातील एका सदस्याला संबंधित प्राधिकरणात नोकरी देण्याचा निर्णय शासनाने घेतला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन निर्णयानुसार शासनाने विस्थापित झालेल्या कुटूंबातील एका सदस्याला प्राधिकरणात नोकरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच किती बाधितांना सेवेत घेतले आहे वा घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०८-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) बारवी प्रकल्प बाधितांना महानगरपालिकेच्या सेवेत सामावून घेणेकरीता जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या कार्यालयामार्फत पात्र प्रकल्पग्रस्तांची यादी तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.
जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या कार्यालयामार्फत पात्र प्रकल्प बाधितांची यादी प्राप्त झाल्यानंतर कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या शासन मंजूर सेवा प्रवेश नियमात नमूद केल्याप्रमाणे आवश्यक बाबींची संबंधित उमेदवारांकडून पुर्तता करून घेऊन नियुक्ती देण्यात येणार असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

---

### उस्मानाबाद जिल्हयातील राज्य परिवहन मंडळाच्या बसगाडयांची झालेली दूरवस्था

**(२३) ५७३८ (१०-०४-२०२०). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद येथील मध्यवर्ती बस स्थानकाच्या सुसज्ज इमारत बांधकामासाठी शासनाकडून भरीव निधी मंजूर होवून या बसस्थानकाच्या पुनर्बांधणीच्या कामाचे उद्घाटन तत्कालीन मंत्री यांच्या हस्ते दिनांक ३१ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधी मंजूर होवून कामाचे उदघाटन होवूनही अद्याप कामाला सुरुवात न होण्यामागची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, तसेच आगारातील अनेक बसेसची दुरवस्था झाली असून नादुरुस्त बसेस चालविण्यात येत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, बसच्या खिडक्या तुटलेल्या, फाटलेले आसन, इंजिनमध्ये वारंवार बिघाड होत असणे, जॅक नसणे अशा अनेक समस्या असूनही विद्यार्थी, चालक-वाहक, प्रवासी जोखीमीने एस.टी. मध्ये प्रवास करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१३-०९-२०२१) :** (१) ते (५) उस्मानाबाद मध्यवर्ती बसस्थानक पुनर्बांधणी कामाचे भुमिपूजन तत्कालीन मंत्री यांचे हस्ते दिनांक ३१.०८.२०१९ रोजी संपन्न झालेले आहे. सद्यस्थितीत राज्य परिवहन महामंडळाकडे निधीची कमतरता निर्माण झाली असल्याने निधी उपलब्ध होताच सदर काम हाती घेण्यात येईल.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वसई (जि.पालघर) तालुक्यातील अनेक रस्त्यांची कामे दीर्घकाळापासून प्रलंबित असल्याबाबत**

**(२४) ६१०३ (२१-०३-२०२०). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि.पालघर) तालुक्यातील अनेक रस्त्यांची कामे दीर्घकाळापासून प्रलंबित असल्याने त्यांचा समावेश नाबार्ड २३ योजनेअंतर्गत (सन २०१७-१८) प्राधान्याने करण्यात यावा यासंबंधीचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निवेदनातील प्रमुख मागण्या काय आहेत,
(३) असल्यास, सदरहू निवेदनातील मागण्यांवर कोणता निर्णय घेतला आहे, निर्णयाचे स्वरुप काय आहे व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (०७-०९-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) सदरहू निवेदनान्वये एकूण ७ पूलांची मागणी करण्यात आली आहे.
(३) निवेदनातील ७ पूलांपैकी २ पूल DPDC अंतर्गत पूर्ण करण्यात आलेले आहेत, २ पूल नाबार्ड-२५ अंतर्गत प्रस्तावित असून त्या कामांचे Appraisal नुकतेच नाबार्ड मार्फत करण्यात आलेले आहे. उर्वरित ३ पूल जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील रस्त्यांवर आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे अधिकृत संकेतस्थळ हॅक झाल्याबाबत**

**(२५) ६६९९ (०७-०४-२०२०). श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे अधिकृत संकेतस्थळ हॅक झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारे संकेतस्थळ हॅक करुन विद्यापीठाची गोपनीय माहिती हॅक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, सायबर क्राइमच्या गुन्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असून अशाप्रकारे संकेतस्थळ हॅक करुन गोपनीय माहिती हॅक होत असल्याने राज्यातील सर्वच महत्वाच्या विभागांना खबरदारी घेण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१६-०९-२०२१) :** (१) खरे आहे.

(२) सदरच्या हॅकींगमुळे विद्यापीठाच्या कोणत्याही प्रकारच्या संगणकीय संग्रहित माहितीचे नुकसान झालेले नाही.

(३) विद्यापीठाचे संकेतस्थळ हॅक झाल्याबाबत Indian Emergency Response Team (CERT-In), New Delhi व सायबर गुन्हे शाखा यांना माहीती कळविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील १२ अकृषक विद्यापीठासह तीन अभिमत विद्यापीठामधील प्राध्यापकांची पदे भरण्याबाबत**

**(२६) ६८५६ (०७-०४-२०२०). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १२ अकृषक विद्यापीठांसह तीन अभिमत विद्यापीठामधील १ हजार १६६ पदांपैकी ६५९ प्राध्यापकांच्या पदासाठी भरती प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेतला असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मुंबई, पुणे विद्यापीठात एकूण मंजूर पदे किती आहेत व प्रत्यक्षात किती पदे अद्यापपर्यंत भरण्यात आली आहेत व अद्याप किती पदे भरणे बाकी आहेत,

(३) असल्यास, उच्च शिक्षण संचालक यांनी राज्यातील सर्व विद्यापीठांना पत्र पाठवून सुधारीत बिंदूनामावली नुसार प्राध्यापकांची भरती प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रस्ताव उच्चशिक्षण संचालक यांनी शासनास सादर केला आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रस्तावास मंजूरी देवून रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती?

**श्री. उदय सामंत (२७-०९-२०२१) :** (१) होय.

(२) (३) (४) व (५) शासन निर्णय दि.०७.०८.२०१९ मध्ये नमूद केल्यानुसार मुंबई विद्यापीठासाठी एकूण ३७८ शिक्षकीय पदे मंजूर असून १६७ पदे भरलेली आहेत व २११ पदे रिक्त आहेत. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासाठी एकूण ४०० शिक्षकीय पदे मंजूर असून २०९ पदे भरलेली आहेत व १९१ पदे रिक्त आहेत. शासन निर्णय दि. ०७.०८.२०१९ अन्वये पद भरतीस मंजूरी दिल्यानंतर त्यानुषंगाने संचालकांनी सदर पदांची बिंदुनामावली सुधारित करून भरतीचा प्रस्ताव

सादर करण्याच्या सूचना संचालक, उच्च शिक्षण यांना राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठांना दिल्या. त्यानुषंगाने संचालक, उच्च शिक्षण यांच्याकडून प्राप्त गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक या विद्यापीठांच्या पदभरतीच्या प्रस्तावास मंजूरी देण्यात आलेली आहे. उर्वरित विद्यापीठांचे प्रस्ताव शासनास अप्राप्त आहेत. शासन निर्णय दि.०४.०५.२०२० अन्वये वित्त विभागाने कोविड-१९ या संसर्गजन्य आजाराच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर वित्तीय उपाययोजनेच्या अनुषंगाने सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यानुसार पदभरतीवर निर्बंध आणलेले आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगांव (जि.वाशिम) या तालुक्यात जादा बस सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२७) ७११७ (१०-०४-२०२०). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.वाशिम) या तालुक्यात शालेय मुलींचा टक्का वाढावा यासाठी शासनाने ग्रामीण भागातील मुलींची गावातून शाळेपर्यंत येण्या-जाण्यासाठी मोफत बस सुविधा उपलब्ध करण्यात आली असून बसेसच्या अनियमित वेळेमुळे शालेय मुलींची गैरसोय होते असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने पालक व मुख्याध्यापक यांनी केलेल्या मागणीनुसार मुलींना ने-आण करण्यासाठी जादा बस सेवा उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१३-०९-२०२१) :** (१) फेऱ्या कमी व अनियमित असल्याबाबतचे वृत्त माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वर्तमान पत्रात प्रसिध्द झाले होते.
(२) मालेगांव (जि.वाशिम) तालुक्यात मानव विकास मिशन अंतर्गत ७ बसेसद्वारे ४४ गावांमधून ९ शाळेच्या ९९७ विद्यार्थीनींची ने-आण केली जाते. पालक व मुख्याध्यापक यांचे मागणीनुसार मा.जिल्हा नियोजन अधिकारी, मा.जिल्हाधिकारी यांना दि.०४.०७.२०१९ व दि.०६.१२.२०१९ रोजी झालेल्या मानव विकास बैठकीमध्ये बसेसची संख्या वाढविण्याबाबत आगार व्यवस्थापक यांना अवगत करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तेल्हारा (जि.अकोला) येथील बस आगारातील विविध समस्यांबाबत**

**(२८) ७३९५ (१०-०४-२०२०). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेल्हारा (जि.अकोला) येथील बस आगाराला विविध समस्यांनी ग्रासले असून प्रवाशांची गैरसोय होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाच्या तेल्हारा आगारा अंतर्गत असलेले रस्ते व शौचालयाची दुरवस्था तसेच बसेसची दयनीय अवस्था झाल्याने बहुतांश गाडया मोडकळीस आल्या असून अनेक गाड्यांचे छत फाटले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गाड्याचे इंजिन भररस्त्यात गरम होऊन बंद पडत असल्याचे प्रकार वारंवार होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तेल्हारा बस आगारातील सर्व पायाभूत सुविधा देऊन प्रवास करण्यास योग्य बसगाड्या देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय वा त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१५-०९-२०२१) :** (१), (२), (३), (४) व (५) राज्य परिवहन महामंडळाच्या अकोला विभागातील तेल्हारा बसस्थानकात प्रवाशांकरिता आसन व्यवस्थेसह प्रतिक्षालय, वाहतूक नियंत्रक कक्ष, लाईट, पंखे, पिण्याचे पाणी, प्रसाधनगृह, हिरकणी कक्ष, वाहनतळ, तिकीट आरक्षण इ. सुविधा आहेत. आगार व बसस्थानकाची नियमित स्वच्छता केली जात आहे. तसेच, बसस्थानकाची दुरुस्ती व रंगरंगोटीचे काम करुन घेण्यात आले आहे.

राज्य परिवहन महामंडळाद्वारे तेल्हारा बसस्थानकाच्या वाहनतळाचे डांबरीकरण करण्याच्या निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. तसेच, प्रवाशांकरिता प्रसाधनगृह बांधण्याच्या कामाचा कार्यादेश दिला असून, सद्यस्थितीत बांधकाम अंतिम टप्प्यात आहे.

तेल्हारा आगाराकडून ३३ नियते चालविण्यात येत असून, त्याकरिता ३५ वाहने उपलब्ध आहेत. सदर वाहनांची आगार पातळीवर आवश्यक ती तपासणी व दुरुस्ती करुन तसेच बॉडीसंबंधी कामे करुनच वाहने मार्गावर दिली जातात. तसेच, वाहन ताफा सुदृढ ठेवण्याकरिता आयुर्मान पुर्ण झालेली वाहने मोडीत काढण्यात आलेली आहेत व त्याठिकाणी नवीन वाहने समाविष्ट करण्यात आलेली आहेत. तसेच, ज्या वाहनांचे इंजिन गरम होत होते त्यांची दुरुस्ती करण्यात आलेली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भाईंदर (जि. ठाणे) येथील रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीमध्ये आयोजित मुंबई विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण अर्ध्यावरच रद्द करण्यात आल्याबाबत**

**(२९) ७४०९ (०७-०४-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाईंदर (जि.ठाणे) येथील रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीमध्ये मुंबई विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण शनिवार, दिनांक १ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास आयोजित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रशिक्षण अर्ध्यावरच रद्द करण्याबाबत मुंबई विद्यापीठाकडून आदेश देण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशाप्रकारे प्रशिक्षण अर्ध्यावरच रद्द करण्याबाबत आदेश देण्यामागची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार अर्ध्यावरच प्रशिक्षण रद्द करण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१६-०९-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) विद्यापीठाने नियोजित कालावधीमध्ये विद्यापीठातील अधिकारी/कर्मचारी यांचे प्रशिक्षण शिबिर, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी मध्ये आयोजित केले होते. विद्यापीठामध्ये सुरु

असलेल्या कामकाजामध्ये सुधारणा आणण्याच्या दृष्टीने विद्यापीठातील अधिकारी/कर्मचारी यांचे प्रशिक्षण घेण्याची जबाबदारी विद्यापीठाची आहे या हेतूने सदरचे प्रशिक्षण रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीमध्ये घेण्यात आले होते. तथापि, नियोजित कार्यक्रमाप्रमाणे दिनांक ०१ फेब्रुवारी, २०२० रोजी प्रशिक्षणाचे पहिले सत्र संपल्यानंतर संध्याकाळी सोशल मिडीया व इलेक्ट्रॉनिक मिडीया व इलेक्ट्रॉनिक मिडीयावरुन राजकीय चर्चा सुरु झाल्यामुळे व आणखी चर्चेस वाव मिळू नये यासाठी प्रशिक्षणाचे दुसऱ्या व अंतिम दिवसाचे प्रशिक्षण थांबविण्यात आले.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांबाबत**

**(३०) ११०४९ (०६-०६-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्याची मागणी मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे माहे मे, २०२० मध्ये वा त्या दरम्यान केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार परीक्षा रद्द करण्यासंदर्भात शासनाला अगदी आपत्कालीन परिस्थितीतही अधिकारिता नसल्याने उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे पत्र विद्यापीठांच्या स्वायत्तता व अधिकारीतेवर आक्रमण करणारे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अंतिम वर्षाच्या परीक्षा न घेतल्यास विद्यार्थ्यांच्या पदवीची वैधताही धोक्यात येण्याची शक्यता तसेच नोकरीसाठी, पदव्युत्तर शिक्षणासाठी विशेषतः विदेशी विद्यापीठांमध्ये प्रवेश घेताना विद्यार्थ्यांचे नुकसान होण्याची शक्यताही सदर पत्र पाठवताना विचारात घेतली गेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२४-०९-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) कोव्हीड-१९ या जागतिक महामारीच्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या गंभीर परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने विद्यापीठांच्या अंतिम वर्षातील/अंतिम सत्रातील विद्यार्थ्यांना परीक्षा न देता विद्यापीठांनी योग्य ते सूत्र वापरुन निकाल घोषित करून पदवी प्रमाणपत्र देण्याचा तसेच ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा द्यायची इच्छा असेल, त्यांना परीक्षेला बसण्याची संधी देण्याचा निर्णय दिनांक १९ जून, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेतकऱ्यांसाठी सुरु असलेल्या योजनांच्या लक्षांकासह अनुदानाच्या रक्कमेत वाढ करणेबाबत**

**(३१) ११४८४ (१४-०९-२०२०). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या वतीने कांदाचाळ बांधणे (प्र.मे.टन रु.३५००/-), शेततळे बांधणे (रु.७५०००/-), ट्रॅक्टर व शेती अवजारे अशा विविध योजनांसाठी लाभ दिला जातो परंतु अल्प लक्षांकामुळे बहुतांश शेतकरी सदरहू योजनांच्या लाभापासून वंचित राहिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना शेती व्यवसाय अधिक सुलभतेने करण्यासाठी सदरहू योजनांच्या लक्षांकामध्ये तसेच अनुदानामध्ये वाढ करण्याची मागणी निफाड विधानसभेचे लोकप्रतिनिधी यांनी माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, द्राक्ष पिकांच्या डिपींगसाठी इलेक्ट्रोस्टॅटिक स्प्रेईंग युनिट या यंत्राचा वापर केला जात असून सदर यंत्राच्या खरेदीसाठी मोठ्या प्रमाणात खर्च येत असल्यामुळे या यंत्राच्या खरेदीसाठी शासनाने अनुदान देण्याबाबतची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने सदरहू योजनांच्या लक्षांकासह अनुदानाच्या रक्कमेत वाढ करुन यंत्राच्या खरेदीसाठी अनुदान देण्याच्या दृष्टीने शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (१४-७-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे. प्राप्त लक्षांकाच्या मर्यादेत शेतकऱ्यांना लाभ देण्यात येतो. परिणामी काही शेतकरी लाभापासून वंचित राहतात.
(२) होय.
(३) शेतकऱ्यांकडून निवेदन प्राप्त नाही.
(४) सन २०२०-२१ मध्ये कृषी यांत्रिकीकरण उपअभियानासाठी केंद्र शासनाकडून रु. ६७.६२ कोटी कार्यक्रमास मान्यता मिळाली आहे. सदर कार्यक्रम कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर मागील वर्षाच्या तुलनेत कमी असल्याने सदर कार्यक्रमाच्या लाक्षांकामध्ये वाढ करणे शक्य होत नाही. इलेक्ट्रोस्टॅटिक स्प्रेईंग युनिटचा समावेश एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान योजनेमध्ये करण्यात आलेला नाही. तरी समावेश करण्याकरीता केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अर्जुनी-मोरगांव (जि.गोंदिया) तालुक्यातील लोकसेवा सहकारी पतसंस्थेतील कार्यरत व्यवस्थापकाने केलेला गैरव्यवहार

**(३२)११५७५ (१५-०७-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अर्जुनी-मोरगांव (जि.गोंदिया) तालुक्यातील लोकसेवा सहकारी पतसंस्थेतील कार्यरत व्यवस्थापकांने सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षात २९ लाख रुपयांचा गैरव्यवहार केल्याची बाब माहे फेब्रुवारी-एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, व्यवस्थापक, श्री.प्रशांत मेश्राम यांनी दिनांक २० फेब्रुवारी, २०२० रोजी सादर केलेल्या लेखा परीक्षण अहवालानुसार उक्त गैरव्यवहार निदर्शनास आला असून, सदर प्रकरणी लेखापरीक्षकांनी या गैरव्यवहाराची लेखी तक्रार अर्जुनी-मोरगांव पोलीस स्टेशन येथे दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने जिल्हा सहनिबंधकांनी संस्थेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१६-०९-२०२१) :** (१) होय.
(२) व (३) अर्जुनी-मोरगांव (जि.गोंदिया) तालुक्यातील लोकसेवा सहकारी पतसंस्थेच्या सन २०१८-१९ च्या लेखापरिक्षण अहवालानुसार पतसंस्थेच्या तत्कालीन व्यवस्थापक श्री. प्रशांत मेश्राम यांनी रु. २९.२८ लाख रकमेचा अपहार केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुषंगाने संबंधीत

लेखापरिक्षकांनी पतसंस्थेच्या व्यवस्थापकाविरुध्द पोलीस स्टेशन अर्जुनी / मोरगाव येथे गुन्हा क्रं.००४४/२०२०, दि. ०४.०३.२०२० रोजी दाखल केला आहे.

सदर गुन्ह्याच्या चौकशीदरम्यान पोलीसांनी पतसंस्थेच्या १० संचालकांवर संशयीत म्हणून गुन्हे दाखल केले आहेत.

दरम्यान पतसंस्थेच्या झालेल्या अपहाराच्या रकमेची जबाबदारी निश्चित करण्यासाठी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, गोंदिया यांनी अधिनियमाच्या कलम ८८ अन्वये चौकशी करण्यासाठी प्राधिकृत अधिकाऱ्याची दि. ०३.०६.२०२० रोजीच्या आदेशान्वये नियुक्ती केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील सहाय्यक आयुक्त (गट-अ) यांच्या रिक्त पदांबाबत

**(३३) ११८२० (१४-०९-२०२०). डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांमध्ये सहाय्यक आयुक्त समाजकल्याण (गट-अ) व तत्सम पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समाजकल्याण अधिकारी (गट ब) व तत्सम पदे या पदांवरील पात्र असणाऱ्या अधिकाऱ्यांना आजपर्यंत पदोन्नती देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समाजकल्याण अधिकारी (गट ब) व तत्सम पदे या पदांवरील सेवा जेष्ठतेमध्ये निम्न स्तरावरील अधिकाऱ्यांना सेवाजेष्ठता यादीमधील वरिष्ठ असणाऱ्या अधिकाऱ्यांना डावलून दिनांक २८ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती देण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, निम्न स्तरावरील अधिकाऱ्यांना पदावनत करून झालेल्या गैरप्रकाराची चौकशी शासन करणार आहे काय,

(५) तसेच सहाय्यक आयुक्त समाजकल्याण (गट-अ) व तत्सम (गट-अ) पदे रिक्त असल्यामुळे मोठ्या प्रमाणात अजा, विजाभज, इमाव, विमाप्र या प्रवर्गाच्या योजना राबवताना येणाऱ्या समस्यांचे निवारण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. धनंजय मुंडे (१७-०९-२०२१) :** (१) होय, अंशतः खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) सन २०१८-१९ च्या निवडसूची वर्षातून सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नतीच्या विचारक्षेत्रात येत असलेले अधिकारी विभागीय पदोन्नती परिक्षा उत्तीर्ण नसल्यामुळे त्यांच्या सेवाकनिष्ठ असलेल्या ७ अधिकाऱ्यांनी विहित संधीत विभागीय परीक्षा उत्तीर्ण केली असल्याने काही अटीच्या अधिन राहून त्यांना शासनाच्या दि.२८.५.२०१९ अन्वये तात्पुरती पदोन्नती देण्यात आली होती.

तद्‌नंतर सहायक आयुक्त, समाज कल्याण अधिकारी गट-अ या पदावर सन २०१९-२० या वर्षी आरक्षण देण्याबाबत सादर केलेल्या प्रस्तावावर सा.प्र.विभागाने एकूण ९ खुला पदांना व दि.२८.५.२०१९ अन्वये तात्पुरती पदोन्नती दिलेल्या ७ अधिकाऱ्यांना पदावनत करून एकूण १६ पदे पदोन्नतीने भरण्यास मान्यता दिली. त्यानुसार शासनाच्या दि. १६.१२.२०२० आदेशान्वये ७

अधिकाऱ्यांना पदावनत केले असून सेवाजेष्ठतेनुसार १५ अधिकाऱ्यांना दि.१८/१२/२०२० रोजीच्या आदेशान्वये पदोन्नती देण्यात आलेली आहे.

तसेच सद्यस्थितीत समाजकल्याण अधिकारी (गट-ब) संवर्गात पात्र ९ अधिकाऱ्यांना सहायक आयुक्त समाजकल्याण गट-अ संवर्गात पदोन्नती देण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

---

**कोरोना या महामारीच्या काळामध्ये महाराष्ट्रात इतर राज्यांमधून आलेल्या स्थलांतरित मजूरांबाबत**

**(३४) ११९९२ (२४-०९-२०२०). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना महामारीच्या काळामध्ये महाराष्ट्रात इतर राज्यांमधून आलेल्या स्थलांतरित मजूरांना त्यांच्या राज्यात पोहचविण्यासाठी स्पेशल रेल्वे गाड्या पुरविण्याची मागणी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आणि रेल्वे विभागाकडे माहे एप्रिल ते जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी केंद्र शासनाकडून व भारतीय रेल्वे विभागाकडून दिनांक १ मे ते ८ जून, २०२० दरम्यान एकूण किती "मजूर स्पेशल" गाड्या कोणकोणत्या मार्गावर (Routes) उपलब्ध करून देण्यात आल्या व उक्त गाड्यांमधून एकूण किती मजूर-कामगारांना त्यांच्या राज्यात स्थलांतरीत करण्यात आले व यासाठी किती खर्च झाला आहे,

(३) असल्यास, उक्त खर्चापैकी राज्य शासनाने रेल्वे भाडे आणि अनुषंगिक खर्चापोटी रेल्वे विभागाकडे किती रक्कम भरलेली असून केंद्र शासनाकडून राज्याला किती मदत व सवलत देण्यात आली आहे ?

**श्री. विजय वडेट्टीवार (११-०९-२०२१) :** (१) होय.

(२) दिनांक १ मे ते १७ जून, २०२० दरम्यान २१ राज्यांमध्ये एकूण ८४१ गाड्या सोडण्यात आल्या असून एकूण १२,१०,११२/- मजूर कामगारांना स्थलांतरीत करण्यात आले.

(३) राज्य शासनाकडून एकूण रु. ९७,७३,९४,८५०/- एवढा निधी वितरीत करण्यात आला.

---

**मुंबईसह राज्यात किराणा मालाची जादा दराने विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(३५) १२०१४ (१४-०९-२०२०). श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यात कोरोना संसर्ग रोखण्यासाठी जाहिर केलेल्या टाळेबंदीच्या कालावधीत दुकाने ठराविक वेळेत उघडी राहत असल्याचा फायदा घेवून बहुतेक व्यापारी जीवनावश्यक वस्तुंची चढ्या दराने विक्री करुन ग्राहकांची मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक करीत असल्याचे माहे मे-जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या काळात शासनाच्या आदेशास न जुमानता ग्राहकास कच्च्या कागदावर पावती देवून किराणा व इतर मालाची व्यापारी वाढीव दराने विक्री करुन ग्राहकांची फसवणूक करीत असल्याचे लोकप्रतिनिधींनी निवेदनाद्वारे माहे मार्च, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आणून दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी जिल्हा पुरवठा अधिकारी हे जाणीवपूर्वक या गोष्टीकडे दुर्लक्ष करीत असल्याने विभागाच्या गस्ती पथकाने प्रामुख्याने शहर व ग्रामीण भागात अचानक भेटी देणे तसेच ग्राहकांची होत असलेली फसवणूक रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (१०-०८-२०२१) :** (१) व (२) लॉकडाऊन काळात व्यापारी वर्गाकडून जीवनावश्यक वस्तूची चढ्या दराने विक्री करत असल्याबाबत पुरवठा आयुक्तांचे कार्यालयास काही तक्रारी हेल्पलाईनवर व ऑनलाईन प्राप्त झाल्या आहेत. सदर तक्रारीनुसार पुरवठा आयुक्तांचे कार्यालयाद्वारे आवश्यक ती कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच जीवनावश्यक वस्तूची चढ्या दराने विक्री करणेस निर्बंध घालणे कामी माहे एप्रिल ते जून, २०२० या कालावधीत शिधावाटप कार्यालयांतर्गत विशेष फिरत्या पथकांची स्थापना करून शिधावाटप कार्यालयनिहाय विभागातील दूकाने/जनरल स्टोअर्स/ मेडीकल स्टोअर्स व सुपर मार्केट यांना अचानक भेटी देऊन कोणतेही गैरप्रकार होत नसलेबाबतची खातरजमा करण्यात आली आहे.

शासनाकडून गरजू व्यक्तींना / लाभार्थ्यांना मंजूर करण्यात आलेल्या नियतनाचे वितरण संबंधित लाभार्थ्यांना योग्य परिमाणानुसार प्राप्त होते किंवा नाही याची दक्षता घेण्यात येत आहे. राज्यात बहुतांश लाभार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने अन्नधान्याचे वितरण करण्यात येत आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना, अंत्योदय अन्न योजना तसेच प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना या शासनाच्या महत्वाकांक्षी योजनेंतर्गत अन्नधान्याचे वितरण बायोमॅट्रिक पध्दतीने ई-पॉस मशीनद्वारे करण्यात आले असल्याने काळाबाजारास आळा घालण्यात आला आहे.
(३) कोरोना संक्रमण कालावधीत तसेच लॉकडाऊन काळात जीवनावश्यक वस्तूंच्या तुटवडा होऊ नये म्हणून व्यापारी संघ व अधिकारी यांचे समवेत वेळोवेळी बैठका घेण्यात येऊन तपासणी पथके तयार करण्यात आली असून पोलीस विभाग, अन्न पुरवठा विभाग, अन्न व औषध प्रशासन, वजनमापे विभाग यांची संयुक्त पथके तयार करून तपासण्या करण्यात आल्या आहेत. कोणताही गैरप्रकार होऊ नये म्हणून जिल्हा प्रशासनाने आवश्यक त्या सर्व उपाय योजना करून अंमलबजावणी करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्हयातील आदिवासी बहुल क्षेत्रातील रस्त्याच्या बांधकामाबाबत

**(३६) १२१७७ (२५-०९-२०२०). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढीगोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी बहुल मेळघाट क्षेत्रातील चौराकुंड चोपण, खोकमार रस्ता, करंजखेडा, हतरु, सेमाडोह (जि.अमरावती) या रस्त्याचे बांधकाम करण्यासाठी लोकप्रतिनिधी यांनी वन विभागासमवेत बैठक घेऊन शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दिनांक ९ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास वन विभाग मंत्रालय व केंद्र शासनाकडे उक्त रस्ताच्या बांधकामासाठी प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रस्ताचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (०८-०९-२०२१) :** (१) चौराकुंड चोपन खोकमार रस्त्याचे श्रेणीवाढ व करजखेडा - हतरू-रायपुर-सेमाडोह या रस्त्यांचे नुतनीकरणाच्या प्रस्तावास महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाच्या दिनांक ०५.१२.२०१८ रोजी आयोजित १४ व्या बैठकीत "मंडळाने मुख्य वन्यजीव रक्षक यांनी घातलेल्या अटीसह सदर प्रस्तावास राष्ट्रीय वन्यजीव मंडळाकडे मान्यतेसाठी पाठविण्याकरिता शिफारस केली." असून सदर प्रस्ताव पूढील कार्यवाहीसाठी राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आले आहेत. मा.सर्वोच्च न्यायालयाद्वारे गठीत समिती CEC ची परवानगी आवश्यक असल्याने सद्यस्थितीत सदर रस्त्याचे प्रस्ताव CEC कडे प्रलंबित आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उदभवत नाही.

---

## व्यंकटापूर (ता.सिरोंचा, जि.गडचिरोली) ग्रामपंचायात मध्ये तेंदूपत्ता लिलाव प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार

**(३७) १२३२८ (१०-०८-२०२०). श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) व्यंकटापूर (ता.सिरोंचा, जि.गडचिरोली) ग्रामपंचायतमध्ये पेसा कायद्याअंतर्गत तेंदूपत्ता लिलाव प्रक्रिया पारदर्शक होण्याकरीता ई-निवीदा काढण्याबाबत जिल्हाधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांचे निर्देश असतांना सुध्दा संबंधित ग्रामसेवक, विस्तार अधिकारी, गट विकास अधिकारी यांनी संगनमत करुन खुल्या पध्दतीने तेंदूपत्त्याची विक्री करुन ग्रामस्थांची फसवणूक केल्याचे माहे मे-जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लिलाव प्रक्रिया पार पाडतांना कमीत कमी ३ कंत्राटदाराची उपस्थिती व ५०,०००/- रुपये अग्रीम स्वरुपात डी.डी. असणे आवश्यक असतांना ठराविक कंत्राटदाराला तेंदूपत्ता संकलनाचे कंत्राट देण्याकरीता केवळ एकच कंत्राटदाराच्या उपस्थितीत नियमबाह्य पध्दतीने निवीदा प्रक्रिया राबविली गेली, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, राज्यात संचारबंदी व सिमाबंदी असताना परराज्यातील मजूर कुठलीही परवानगी न घेता ग्रामपंचायत हद्दीत दाखल होवून ग्रामपंचायत परिसरात मुक्काम केला परंतु ग्रामसेवक, विस्तार अधिकारी व गट विकास अधिकारी यांनी याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, तेंदूपत्ता लिलाव प्रक्रियेत झालेल्या गैरव्यवहाराची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित दोषी कर्मचारी व अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१५-०७-२०२१) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) सदर प्रकरणी जिल्हा परिषद, गडचिरोली यांच्या स्तरावर चौकशी करण्यात आली असून चौकशी अंती लिलाव प्रक्रियेत कोणतीही गैरव्यवहार किंवा अनियमितता झाल्याचे दिसून येत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जामडी वनपरिक्षेत्र (जि.गोंदिया) अंतर्गत अवैध रेती वाहतूक करण्यासंदर्भात एकाच प्रकरणात विविध प्रकारचे दंड आकारण्यात आले असल्याबाबत**

**(३८) १२४४६ (१३-०९-२०२०). श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जामडी वनपरिक्षेत्र (जि.गोंदिया) अंतर्गत अवैध रेती वाहतूक करण्यासंदर्भात अनुक्रमे दि. १७ फेब्रुवारी, २०२० व दि. ३१ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेडच्या अधिकाऱ्यांमार्फत भारतीय वन अधिनियम अंतर्गत गुन्हे नोंदवण्यात आले असून संबंधितांना दंड करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कार्यवाही करण्याचे अधिकार राजस्व विभागाला असून फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड चे अधिकारी उक्त प्रकरणी अवैध वसुली करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, उक्त दंड माफ करण्यासाठी फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेडच्या अधिकाऱ्यांमार्फत संबंधितांना बोलावून अवैधरित्या पैश्यांची मागणी करीत असल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडे करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने दोषी अधिकाऱ्यांवर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (०८-०९-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही. हे खरे नाही. संबंधित प्रकरण हे राखीव जंगलातील असून भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम २, २६(१) ड व ग, ३(ग), ४१, ४२(२), ५२(१), ६८(अ) नुसार महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक एस-३०/०२/२०१३/प्र.क्र.२१/एफ-६, दि.२२.०५.२०१३ मध्ये प्रदत्त शक्तीचा वापर करुन कार्यवाही करण्यात आली आहे.

(३) या प्रकरणाबाबत कुठल्याही प्रकारची लेखी अथवा तोंडी तक्रार प्राप्त झालेली नाही.

(४) नाही. वरील प्रमाणे तक्रार प्राप्त न झाल्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोरेगाव चेक नाका ते आरे कॉलनी (मुंबई) येथे उभारण्यात आलेल्या उद्यानाबाबत**

**(३९) १२४८६ (१३-०९-२०२०). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरेचे सौंदर्य अबाधित ठेवण्यासाठी, पर्यावरणाच्या संरक्षणासाठी स्थानिक जनतेच्या व निसर्गप्रेमींच्या मागणीनुसार आरे प्रशासनाच्या परवानगीने शासनाच्या निधीतून गोरेगाव चेक नाका ते आरे कॉलनी (मुंबई) येथे दोन उद्यानांचे काम पूर्ण करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उद्यानाचे हक्क शासनाकडे अबाधित ठेवून तत्कालीन मंत्री महोदयांनी काळजीवाहू तत्वावर खाजगी स्वयंसेवी संस्थाना या उद्यानांची देखभाल करण्याच्या सूचना आरे प्रशासनास दिनांक २८ ऑगस्ट, २०१३ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत देवूनही ही उद्याने देखभालीसाठी स्वयंसेवी संस्थाना अद्याप देण्यात आली नाहीत, हे खरे आहे काय,

(३) तसेच, सदर उद्यानांची देखभाल करण्यास संस्था तयार असल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधीनी कळवून देखील प्रशासनाने परवानगी न दिल्याने सदर उद्यानातील झाडे व औषधी वनस्पती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी या संदर्भात मा. मंत्री महोदयांना दिनांक ५ व ६ फेब्रुवारी, २०१३ रोजी वा त्यासुमारास केलेल्या पत्रव्यवहारानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार (२०-०९-२०२१) :** (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) सदर उद्यानामध्ये कोणताही अनुचित प्रकार घडु नये तसेच संरक्षणाच्या दृष्टीने सदर उद्याने बंद ठेवण्यात आलेली आहेत. सदर उद्यानामधील झाडांची व वनस्पतींची नैसर्गिकरित्या वाढ होत असल्याने तेथील झाडे व वनस्पती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत अशी वस्तुस्थिती नाही.
(४) सदर पत्रव्यवहारास अनुसरुन दि.२८.८.२०१३ रोजी तत्कालीन मा. मंत्री (पदुम) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सौर ऊर्जा निर्मिती करणाऱ्यांना सबसिडी मिळण्याच्या लाभापासून महाराष्ट्र राज्य वंचित राहील्याबाबत

**(४०) १२७४३ (२४-०९-२०२०). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इमारती किंवा घरांच्या छतांवर ३० किलोवॅट पर्यंत सौर उर्जा निर्मिती करणाऱ्यांना ४० टक्के तर त्यापेक्षा जास्त निर्मितीसाठी २० टक्के सबसिडी देण्याची केंद्र शासनाची योजना आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पहिली दोन वर्ष ही सबसिडी महाऊर्जा कंपनीच्या माध्यमातून वितरित केली जात होती त्यातून राज्यात १२० मेगावॅट वीजनिर्मिती होऊन त्यापोटी जवळपास २०० कोटींची सबसिडी ही मिळाली मात्र गेल्या वर्षी या सबसिडी वितरणाचे काम महावितरण कंपनी कडे सोपविल्यापासून सबसिडी मिळणे बंद झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, ऊर्जा निर्मितीसाठी आवश्यक यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी लागणारे साहित्य महावितरणने प्राधिकृत केलेल्या विक्रेत्यांकडूनच खरेदी करावी लागते मात्र महावितरणाकडे उक्त विक्रेते उपलब्ध नसल्याने ऊर्जा निर्मिती न झाल्याने योजनेतंर्गत देण्यात येणारी सबसिडी मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबधित दोषी अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) तसेच, ऊर्जा निर्मितीसाठी आवश्यक असलेले साहित्य उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१५-०९-२०२१) :** (१) केंद्र शासनाच्या रुफटॉप सौर योजना टप्पा-२ अंतर्गत ३ किलोवॅट क्षमतेपर्यंत ४०% व ३ ते १० किलोवॅट क्षमतेपर्यंत २०% केंद्रीय वित्त सहाय्य देण्याची योजना आहे.
(२) याआधी रुफ टॉप सौर योजना ही वित्तीय वर्ष २०१७-१८ व २०१८-१९ साठी केंद्र शासनाने महाऊर्जामार्फत राबविण्यास मंजूरी दिली होती. त्यानुसार राज्यामध्ये महाऊर्जामार्फत एकूण १०५ मेगावॅट क्षमतेच्या संयंत्राच्या एकूण १२००० लाभार्थ्यांना मंजूरी दिली. याकरीता केंद्र शासनाकडून रु.१७३ कोटी निधी मंजूर झाला आहे. त्यापैकी रु.१००.३ कोटी निधी महाऊर्जास प्राप्त झाला असून तो संबंधित लाभार्थ्यांना वितरीत करण्यात आला आहे. आता वित्त वर्ष २०२०-२१ पासून ही योजना प्रथमच महावितरण कंपनीकडून राबविण्याच्या केंद्र शासनाच्या सूचना आहेत. महावितरणद्वारा सन २०१९-२० या वर्षाकरीता २५ मेगावॅट इतक्या क्षमतेस केंद्र शासनाद्वारे मंजूरी देण्यात आली होती व सन २०२०-२१ करीता ५०० मेगावॅटच्या क्षमतेस केंद्र शासनाने मान्यता दिली असून ती देशात सर्वोच्च आहे.

(३) रुफटॉप सौर योजनेच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार वितरण कंपनीला घरगुती ग्राहकांच्या आवारात सौर ऊर्जा यंत्रणा उभारण्याकरीता सौर ऊर्जा संयंत्रणांचा पुरवठा करणे, स्थापना, चाचणी व कार्यान्वयन करण्यासाठी नोंदणीकृत पुरवठादाराची नेमणूक करणे आवश्यक आहे. त्यानुसार आवश्यक पूर्वतयारी करण्याच्या दृष्टीने महावितरण कंपनीने प्राप्त मंजुरीच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार निविदा तयार करुन पुढील कार्यवाही नियोजित आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पिंपरी-चिंचवड व परिसरातील नागरिकांसाठी नवीन प्रादेशिक परिवहन विभागीय कार्यालय सुरु करणेबाबत

**(४१) १२८२७ (१६-०९-२०२०). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी चिंचवड व हिंजवडी चाकण देहूरोड औद्योगिक परिसरातील वाढती लोकसंख्या व वाहनांची संख्या लक्षात घेता नागरिकांना वाहन नोंदणी, नवीन ड्रायव्हिंग लायसन्स, वाहनांचा कर भरणे, खाजगी बसेस रिक्षा व वाहतुकीच्या चार चाकी गाड्यांचे परमिट काढणे इत्यादी विविध कामांकरिता शहरातील फुले नगर संगम ब्रिज दिवेघाट तसेच पुणे किंवा बारामती येथील विभागीय कार्यालयात परिवहन विभागाच्या कामाकरता वारंवार जावे लागते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पिंपरी-चिंचवड परिसरातील नागरिकांकरिता पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात प्रादेशिक परिवहन विभागाचे कार्यालय सुरू करणे तसेच पिंपरी-चिंचवड शहरात नवीन विभागीय कार्यालय सुरू करण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्यावतीने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे जागा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी पिंपरी-चिंचवड शहरात नवीन प्रादेशिक परिवहन विभागीय कार्यालयासाठी जागा उपलब्ध होणे तसेच परिसरातील नागरिकांच्या शिकाऊ वाहन परवाना केंद्राचे विकेंद्रीकरण करणेबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१०-०७-२०२१) :** (१) नाही.
वाहन नोंदणी, नवीन अनुज्ञप्ती, वाहनांचा कर भरणे,खाजगी बसेस, रिक्षा व चार चाकी वाहनांचे वाहतूक परवाने इ. संबंधित सर्व कामे उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड येथे करण्यात येतात.
(२) पिंपरी-चिंचवड क्षेत्रासाठी सद्यस्थितीत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड हे स्वतःच्या कार्यालयीन इमारतीमध्ये सुरू आहे. सदर कार्यालयासाठीचा ब्रेक टेस्ट ट्रॅक दि.०१.११.२०१७ रोजी कार्यान्वीत झाला असून वाहनांची वाढती वाहनसंख्या विचारात घेऊन अतिरिक्त ब्रेक टेस्ट ट्रॅक व वाहन तपासणी केंद्र स्थापन करण्यासाठी शासन ज्ञापन दि.१९.०३.२०२० अन्वये मौजे चिखली ता. हवेली जि. पुणे येथील गट क्र.५३९ मधील पेठ क्र.१३ मधील ४.०० हेक्टर जमीन प्रदान केली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे येथील अप्पर कामगार आयुक्त कार्यालयातील शिपाई आणि लिपिक भरती मध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(४२) १२९५६ (१७-०९-२०२०). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील अप्पर कामगार आयुक्त कार्यालयाने लिपिक आणि शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेसाठी नेमलेल्या संस्थेनेच उत्तरपत्रिकेत खाडाखोड करून उमेदवाराच्या निकालात फेरफार केल्याची घटना माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थेने आर्थिक प्रलोभनाला बळी पडून नियमांना बगल देऊन भरती प्रक्रियेतील क्रमांक एक आणि दोन उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेत खाडाखोड व निकालात फेरफार केला असून, यामुळे दोन उमेदवारांना शासकीय सेवेपासून वंचित रहावे लागले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संस्थेविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१६-०९-२०२१) :** (१) शिपाई पदावर निवड न झालेल्या २ उमेदवारांनी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने मा.न्यायाधिकरणाने दिलेल्या आदेशानूसार त्यांच्या मुळ उत्तरपत्रिकांची न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय,मुंबई यांचेकडून तपासणी करण्यात आली. त्यांनी दिलेल्या दि.१/१०/२०१९ रोजीच्या अहवालानूसार या २ मुळ पत्रिकेमध्ये फेरफार झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) अपर कामगार आयुक्त, पुणे या प्रादेशिक विभागाची गट क व गट ड संवर्गातील रिक्त पदांची भरती प्रक्रिया पार पाडण्यासाठी निवड करण्यात आलेल्या मे. एक्झॉन ऑटोमेशन प्रा.लि., मुंबई या संस्थेचे संचालक प्रसाद बांदिवडेकर व संस्थेचे कर्मचारी आनंद काळे व इतर अनोळखी व्यक्ती यांचेविरुध्द अपर कामगार आयुक्त, पुणे यांनी दि.२३/०६/२०२० रोजी खडकी पोलीस स्टेशन, पुणे येथे भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ४६५,४६७,४६८,४७१,४१९,४२०,३४ अन्वये (प्रथम खबर क्र.०२७१) एफ.आय.आर. दाखल करण्यात आला असुन पोलीस तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## उस्मानाबाद जिल्हाधिकारी कार्यालयातील दलित वस्ती योजनेतील गैरव्यवहाराबाबत

**(४३) १२९६७ (१६-०७-२०२०). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हाधिकारी कार्यालयात दलित वस्तीयोजनेत साडेनऊ कोटीं रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयातील नगरपालिकांच्या विकासासाठी आलेला निधी परस्पर जिल्हाधिकारी कार्यालयाअंतर्गत असलेल्या जिल्हा प्रशासन अधिकाऱ्याने ठेकेदारांशी संगनमत करुन परस्पर खर्च केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार काय आढळून आले, त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०८-२०२१) :** (१) उस्मानाबाद जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सन २०१८-१९ व सन २०१९-२० या वर्षातील जिल्हा नियोजन समितीमार्फत नगर विकास शाखेस प्राप्त निधीच्या विनियोगात गैरव्यवहार झाल्याचे जानेवारी, २०२० च्या सुमारास निदर्शनास आलेले आहे.
(२) होय.
(३) अपर विभागीय आयुक्त-१, औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखालील समितीचा अहवाल विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना प्राप्त झालेला आहे.
सदर समितीच्या अहवालानुसार चौकशीतील मुद्द्यांच्या अनुषंगाने दोषी असणाऱ्या विरुद्ध आनंदनगर पोलीस स्टेशन, उस्मानाबाद येथे गुन्हे नोंद करण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**उच्च व तंत्र शिक्षण देणा-या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सन २०१९-२०२० या वर्षाची शिष्यवृत्ती अद्याप न मिळाल्याबाबत**

**(४४) १३२५१ (१५-०८-२०२०). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अभियांत्रिकी, औषधनिर्माण शाळा, तंत्रनिकेतन हॉटेल व्यवस्थापन या तांत्रिक अभ्यासक्रमांतील विद्यार्थ्यांसाठी शासनाने "डीबीटी" (डायरेक्ट फंड ट्रान्सफर) याद्वारे शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्याबाबतची योजना लागू केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाविद्यालयांमार्फत अर्ज प्रक्रिया पूर्ण करुनही सन २०१९-२०२० या वर्षीची शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांना अद्याप मिळाली नसल्याचे दिनांक ९ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यात काय आढळून आले व त्यानुसार विद्यार्थ्यांना मागील वर्षाच्या शिष्यवृत्तीचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (१६-०९-२०२१):** (१) होय.
"राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" या नावाने ही योजना कार्यान्वीत केलेली आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत येणाऱ्या विविध अभ्यासक्रमांकरीता शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेल्या शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मधील ६३३ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा पहिला व दुसऱ्या हप्त्याची तर ४५०११ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या दुसऱ्या हप्त्याची रक्कम, पुरेशी तरतूद उपलब्ध नसल्याच्या कारणास्तव देता आली नसल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) या विद्यार्थ्यांची शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मधील प्रलंबित थकबाकीची रु.७७.३५ कोटी इतकी रक्कम चालू आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतूदीतून देण्याबाबत दि.२६ ऑगस्ट, २०२० रोजी आदेश निर्गमित केले आहेत.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**टाळेबंदीच्या काळात किरकोळ बाजारात ग्राहकांची आर्थिक लूट व फसवणूक होत असल्याबाबत**

**(४५) १३३८८ (२०-०९-२०२०). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, ठाणे व आसपासच्या उपनगरांना ए.पी.एम.सी. मार्केटमधून भाजीपाल्यासह जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा सुरु असतानाही टाळेबंदीचे कारण सांगून किरकोळ बाजारात वस्तु जादा दराने विकून ग्राहकांची आर्थिक लूट व फसवणूक करण्यात येत असल्याचे दिनांक २३ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाशी येथील ए.पी.एम.सी. मार्केटमध्ये १२ रुपये प्रति किलो दराने मिळणारा कांदा २५ ते ३० रुपये चढ्या दराने विक्री करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, टाळेबंदीच्या काळात ग्राहक व जनतेची होत असलेली आर्थिक लूट व शोषण रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१४-०९-२०२१) :** (१) व (२) महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन), अधिनियम, १९६३ मध्ये दि.०५ जुलै, २०१६ रोजीपासून सुधारणा केली असून, भाजीपाला व फळांच्या बाबतीत राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे कार्यक्षेत्र बाजार आवारापुरते मर्यादित करण्यात आले आहे. किरकोळ बाजारात भाजीपाला व फळे जादा दराने विक्री केल्याबाबतची कोणतीही तक्रार मुंबई, ठाणे व आसपासच्या बाजार समित्यांकडे प्राप्त झालेली नाही.

(३) व (४) प्रश्न उदभवत नाही.

---

**डी.एड आणि बी.एड असलेल्या शिक्षकांना अजून एक अतिरिक्त पात्रता परिक्षा (TET \ CET ) पास करण्याबाबत**

**(४६) १३५६६ (१८-०७-२०२०). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण विभागाने डी. एड आणि बी . एड असलेल्या शिक्षकांना अजून एक अतिरिक्त शिक्षक पात्रता परिक्षा (TET \ CET ) पास करण्यासाठी दिनांक ३१ मार्च, २०१९ रोजीची शेवटचीसंधी दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १ जानेवारी, २०२० पासून ज्यांनी (TET \ CET ) परिक्षा पास नाही केली त्यांची सेवा समाप्त करणे तसेच त्यांचे वेतन बंद करण्यासाठी आदेशित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शासन निर्णयामुळे अनेक शिक्षक बेरोजगार होऊन त्यांच्यावर उपासमारीची वेळ येणार असल्यामुळे सदर आदेशाला मुदत वाढवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२०-०९-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) दि. ०६ मे, २०१९ च्या अर्धशासकीय पत्रान्वये शिक्षक पात्रता परीक्षा, पात्र होण्यासाठी मुदतवाढ देण्याची विनंती केंद्रीय मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांना करण्यात आली होती. तथापि, सदर विनंती अमान्य करण्यात आली.

---

**सांगली जिल्ह्यातील राजेवाडी (म्हसवड) तलावाचा जिहे काठापूर सिंचन योजनेमध्ये समावेश करणेबाबत**

**(४७) १३६२१ (१०-०९-२०२०). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील राजेवाडी (म्हसवड) तलावाचा जिहे काठापूर योजनेमध्ये समावेश करण्याबाबत शासन विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तलावाचा जिहे काठापूर योजनेमध्ये समावेश केल्यास परिसरातील आटपाडी सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांना फायदा होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राजेवाडी (म्हसवड) तलावाचा जिहे काठापूर योजनेमध्ये तातडीने समावेश करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (१२-०७-२०२१) :** (१) होय.

(२) होय.

(३) राजेवाडी (म्हसवड) तलावाचा जिहे कठापूर योजने मध्ये समावेश करण्यासाठी आवश्यक माहिती क्षेत्रिय स्तरावरून प्राप्त करण्याचे प्रकरण कार्यवाहीत असून त्यानुसार सदर प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल. तथापि दि.०८/०३/२०१९ च्या पत्रान्वये पाण्याच्या उपलब्धतेनुसार राजेवाडी तलावात पाणी सोडण्यासाठी जिहे कठापूर प्रकल्पाचे मंजूर पाणी वापराच्या मर्यादेत पुढील आदेशापर्यंत शासनाची तत्वत: मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**कोव्हीड रुग्णांना देण्यात येणाऱ्या रेमडेसिवीर इंजेक्शनाचा काळा बाजार होत असल्याबाबत**

**(४८) १३८७७ (१९-०७-२०२०). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.राहूल कुल (दौंड), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोव्हीड रुग्णांसाठी प्रभावी ठरणाऱ्या रेमडेसिवीर इंजेक्शनाचा मोठ्या प्रमाणात काळा बाजार सुरु असल्याचे दिनांक १० जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या इंजेक्शनची १० पट अधिक दराने विक्री होत असून ते सध्या काळ्या बाजारात ३० ते ४० हजार रुपये किंमतीने विकले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या इंजेक्शनचा काळा बाजार करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (१६-०९-२०२१) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

(३) सदर कालावधीमध्ये ठाणे कार्यालयांतर्गत मिरारोड येथे सदरची घटना निदर्शनास आली होती. ज्यामध्ये सदर औषधांचे ४ व्हायल आढळल्या होत्या. त्याबाबत पोलिस व प्रशासनामार्फत त्वरीत कारवाई घेण्यात आली आहे.

सदर औषधांची छापलेली किंमत रु. ५४००/- प्रति व्हायल असून, त्याची विक्री रु.२०,०००/- इतक्या किमतीत केल्याचे प्रशासन व पोलिसांच्या संयुक्त कारवाई वेळी निदर्शनास आले.

सदर प्रकरणी प्रशासनामार्फत एफ.आय.आर. क्र. ०१६६ दि. १०.०७.२०२० मिरारोड पोलिस स्टेशन येथे दाखल केला असून ३ आरोपी विरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांमार्फत पुढील तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## सन २०१५ चे रब्बी हंगामातील अनुदान मिळण्याबाबत

**(४९) २७१५४ (०६-०५-२०२१). श्री.आशुतोष काळे (कोपरगाव) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१५ मध्ये रब्बी हंगामातील पिकांचे नुकसान झालेल्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पिकांची अंतिम आणेवारी पन्नास पैशापेक्षा कमी असल्याने नुकसान भरपाई देण्यात यावी अशी शासनाने निर्णयानुसार नुकसान भरपाई जाहीर करण्यात आली, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त शासन निर्णयानुसार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आली पंरतु कोपरगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना पीकविमा तसेच अंतिम आणेवारीनुसार नुकसान भरपाई देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहु प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोपरगावातील सन २०१५ मधील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अंतिम आणेवारीनुसार नुकसानभरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (१३-०९-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे. सन २०१५-१६ च्या रब्बी हंगामात दि. २७.०४.२०१६ च्या शासन निर्णयान्वये सोलापूर व अहमदनगर जिल्हयात दुष्काळ घोषित केलेल्या १९९१ गावांतील दुष्काळामुळे बाधित शेतकऱ्यांना महसूल व वन विभाग शासन निर्णय दि. २९.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार मदतीचे वाटप करण्यात आलेले आहे.

(२) व (३) शासन निर्णय दि. २९.१२.२०१६ मधील अनुदानाच्या निकषामध्ये कोपरगांव तालुका बसत नसल्याने या तालुक्यातील शेतकऱ्यांना मदत देय झाली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आदिवासी विकास महामंडळाकडून शेतकऱ्यांच्या भात विक्रीचे पैसे अद्याप मिळाले नसल्याबाबत**

**(५०) २७६०८ (१५-०६-२०२१). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे खानिवली, गोऱ्हे, पोशेरी, परळी, खैरे-आंबिवली, गुहीर, कळंभे, मानिवली व गारगांव (ता.वाडा, जि.पालघर) येथील भात खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांनी विक्री केलेल्या भाताची आदिवासी विकास महामंडळाकडून सुमारे १६ कोटी २८ लाख १३ हजार ४२२ रुपये इतकी रक्कम देय असून गत दोन महिन्यांपासून अद्यापही त्यांना रक्कम मिळाली नसल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रक्कम न मिळाल्याने सेवा सहकारी सोसायटयांकडून घेतलेले कर्ज फेडण्यास शेतकऱ्यांना अडचण निर्माण होत असल्याचे दिनांक १९ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित शेतकऱ्यांना भात विक्रीचे पैसे आदिवासी विकास महामंडळाकडून मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (२५-०८-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत आदिवासी उपयोजना क्षेत्रात प्रादेशिक कार्यालय, जव्हार अंतर्गत उप प्रादेशिक कार्यालय, मोखाडा अंतर्गत एकूण ४४९ शेतकऱ्यांकडून वजन १४,६८३.८० क्विंटल धानाचे रक्कम रु.२.६९ कोटी इतकी रक्कम धान विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांच्या बँक खात्यात ऑनलाईन पध्दतीने जमा करण्यांत आली आहे. त्यामुळे चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रणालय : शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.